**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

**प्रसिद्धीसाठी** जुलै २३, २००७

## २६ जुलै २००५ च्या प्रलयाच्या बाबतीतील मदत आणि पुनर्वसन, भ्रष्टाचार आणि भारत सरकारकडून मिळालेल्या सहाय्यावरील अहवालाची भाजपची मागणी

## २६.७.०५ च्या घटनेनंतर दोन वर्षानी व्यक्ती आणि कबूल केलेले पैसा, दोन्ही गायब आहेत.

## ४४ व्यक्ती, भारत सरकारने दिलेले रु. १२,५०० कोटीचे आर्थिक सहाय्य आणि मिठी नदीसाठी असलेला रु. १२५० कोटीचा निधी अजून गायब आहे.

पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, मुख्यमंत्री विलासराव देशमुख अशा सरकारच्या आणि काँग्रेसच्या सर्व बड्या नेत्यानी २६ जुलै २००५ च्या घटनेनंतर, पूरग्रस्त सहाय्य म्हणून केंद्राकडून रु. १२,४११ कोटी, मिठी नदीसाठी रु. १,२५० कोटी आणि ब्रिमस्टोवाड- मुंबई स्टॉर्म वॉटर ड्रेनेज सिस्टीम, साठी रु. १,६०० कोटीच्या आर्थिक सहाय्याच्या अनेक घोषणा केल्या.

२४ महिन्यानंतर, आपल्याला काय मिळाले ? फक्त रु. १,२४२ कोटी. मुंबईला काहीच मिळालं नाही.

मदत आणि पुनर्वसनाच्या उपायांची दयनीय अवस्था अशी आहे कि, जेमतेम १० % नुकसान भरपाई देण्यात आली आहे. विधानभवनात राज्य सरकारने केलेल्या निवेदनानुसार, एकूण नुकसान रु, १३,१०० कोटींचं झालं, त्यासाठी रु. १२४२ कोटीच्या मदतीचं वाटप करण्यात आलं. यापैकी जेमतेम ५० % रक्कम संबंधित व्यक्तिंपर्यंत पोचली, असं कम्प्ट्रोलर आणि ऑडिटर जनरलनी निदर्शनाला आणलं आहे.

कॅगने आपल्या अहवालात मदतकार्यातील भ्रष्टाचार, अपारदर्शकता आणि गोंधळ यावर कडक ताशेरे ओढले आहेत. कॅगनी असे म्हटले आहे कि,

कॅगने आपल्या अहवालात मिठी नदी कायाकल्प प्रक्ल्पावरहि ताशेरे ओढले आहेत. त्यानी असे म्हटले आहे कि, एमएमआरडीए आणि तिच्या कंत्राटदारांची कामे आणि प्रदानाची यंत्रणा पूर्णपणे अपारदर्शी आहे.

कॅगने राज्य सरकारला मदत आणि पुनर्वसनाच्या उपायांची आणि निधी वाटपाची संपूर्ण चौकशी करण्यास सांगितले आहे.

भाजपने खालील बाबतीत संपूर्ण स्थिती अहवालाची मागणी केली आहे.

१) बळी पडलेल्याना/बाधित लोकाना दिलेली मदत आणि आर्थिक स्हाय्य,
२) भ्रष्टाचार
३) अजून पूर्ण व्हायचे बाकी असलेले मदतकार्य, पुनर्वसन
४) केंद्राकडून प्राप्त झालेले एकूण अर्थसहाय्य
५) राज्य सरकारने दिलेली एकूण आर्थिक मदत
६) २६ जुलै २००५ नंतर दिलेली आश्वासने
७) मदत कार्यातील भ्रष्टाचाराच्या चौकशीची स्थिती
८) कॅगच्या शिफारशींची अंमलबजावणी.

**प्रसिद्धी सचिव**

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081-
Tel21639649/21634152/ (M)9869220027 ● Fax : 21637432
Email: kirit@vsnl.in, kiritsomaiya@gmail.com Website : www.kiritsomaiya.com